Colaba-Bandra-SEEPZ Metro III Corridor

## मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे एमएमआरडीएच्या पुनर्वसन वसाहतीत वृक्षारोपण उपक्रमास प्रारंभ

*लल्लूभाई कंपाउंड, नटवरलाल पारेख विभागात ३५० वृक्ष लावण्याचा मुं.मे.रे.कॉचा मानस*

**मुंबई, १३ जुन २०१८:** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (मुं.मे.रे.कॉ) लल्लूभाई कंपाउंड , नटवरलाल पारेख विभागात वृक्षारोपण अभियानाचा प्रारंभ आज करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत ३५० वृक्षांचे रोपण करण्याची योजना आहे.

मुंबईमध्ये ज्या परिसरात स्वच्छता, सुधारणा आणि सौंदर्यीकरण यांची गरज आहे अशा परिसराची निवड करण्यात आली आहे. लल्लूभाई कंपाउंड, नटवरलाल पारेख विभागात ६५ इमारती असून विविध पायाभूत सुविधा प्रकल्पा अंतर्गत पुनर्वसन झालेली १०,००० पेक्षा अधिक कुटुंबांचे वास्तव्य या वसाहतींमध्ये आहे. या वसाहतीतील नागरिकांसाठी वृक्षारोपणाबरोबरच खेळण्याचे मैदान, बगिचा, हिरवळ, स्वच्छतागृह, पदपथ, खतनिर्मिती प्रकल्प या समाजोपयोगी सुविधाही निर्माण करण्यात येतील.

या अभिनव उपक्रमाविषयी बोलताना एमएमआरसी च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, " आम्ही आज मानखुर्द येथे एमएमआरडीएच्या पुनर्वसन वसाहतीतील वृक्षारोपणाचं पाहिलं सत्र सुरू करत आहोत. या दुर्लक्षित परिसराला खासकरून सुधारणेची गरज असते."

एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे, प्रकल्प (संचालक), श्री एस के गुप्ता, कार्यकारी संचालक - (नियोजन) - श्री आर रमणा आणि कॉर्पोरेशनचे वरिष्ठ अधिकारी या प्रसंगी उपस्थित होते.

आजच्या या कार्यक्रमात नगरसेवक श्री विठ्ठल लोकरे आणि सह्याद्री सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष हेमंत बोरकर यांनी उपस्थित राहून विशेष सहकार्य केलं. यावेळी देशी प्रजातींपैकी बकुळ, आकाशनीम, नीम, बहावा या आणि अशा प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली.

(Ends)

**For media queries, please contact**

**Vaidehi More**
+91 9028 543087
Vaidehi.more@mmrcl.com

**Sukriti Kumar**
+91 9833 252547
Sukriti.kumar@bm.com